# Academic Year 2023-24

## 7.2 Best Practices

धुळे दवंडी Mob : 9372874650/9657804650 व्यक्ती विशेष dhuled

# माजी आ.कै.गोजरताई भामरे यांच्या स्मृतीदिनानिमित्त विविध कार्यक्रम

साक्री (अनिल देसले दै. धुळे दवंडी) : आई-वडिलांची सेवा हीच सर्वश्रेष्ठ असून उच्चशिक्षित झालेल्या विद्यार्थ्यांनी वृद्धाश्रमांची संख्या कमी होण्यासाठी नेहमी प्रयत्नरत राहावे असे प्रतिपादन विद्या विकास मंडळाचे सचिव सुरेश पाटील यांनी केले.



विद्या विकास मंडळाचे सिताराम गोविंद पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री जि धुळे राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, क्रीडा विभाग व विद्यार्थी विकास विभाग आयोजित माजी आमदार कै सौ गुजरताई भामरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त " भव्य रक्तदान व रक्तगट तपासणी शिबीर तसेच युवती सभा उद्घाटनाच्या अध्यक्षीय समारोप प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाचे उद्घाटन लोकनेते माणिकराव गावित महाविद्यालय विसरवाडीच्या प्राचार्य डॉ जयश्री माणिकराव गावित यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून विद्या विकास मंडळाचे प्रशासकीय अधिकारी डॉ डी एल तोरवणे, शासकीय रुग्णालय धुळे चे रक्तपेढी प्रमुख डॉ महेश जोशी, प्राचार्य डॉ राजेंद्र अहिरे, उपप्राचार्य डॉ अनंत पाटील, साक्री तालुक्यातील प्रतिष्ठित नागरिक प्रसंगी उपस्थित होते. उद्घाटना प्रसंगी प्राचार्य डॉ जयश्री गावित यांनी ज्या घटकांना व्यक्त होता येत नाही अशा आदिवासी महिलांचे नेतृत्व माजी आमदार कै सौ गोजर ताई भामरे यांनी सक्षम पद्धतीने केल्याचे मत व्यक्त केले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांची योग्य जाणीव कै गोजरताईंना असल्यामुळे त्यांनी शेतकऱ्यांसाठी मोठा अभ्यास दौरा आयोजित केला होता. सामाजिक प्रश्नांची योग्य ती जाण ठेवून राजकारणात देखील त्यांनी आपला स्वतंत्र ठसा उमटवला. विद्यार्थिनींनी गोजरताईंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून मार्गक्रमण करावे असा देखील सल्ला त्यांनी प्रसंगी दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ अनंत पाटील यांनी केले. प्रसंगी आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरात ३३ सहभागींनी रक्तदान केले. तर २१५ विद्यार्थी विद्यार्थिनी मोफत रक्तगट तपासणी करून घेतली. त्याचबरोबर वनस्पती शास्त्र विभागामार्फत आयोजित सलाद डेकोरेशन स्पर्धेत देवश्री बागुल प्रथम, जो हा पठाण व आईशा पठाण द्वितीय, मेहेक शेख तृतीय व गायत्री कापडे व पूनम हिरे उत्तेजनार्थ, फ्लॉवर अरेंजमेंट स्पर्धेत नलिनी चांदुरकर प्रथम, यश वैष्णव द्वितीय, गोपाळ पावरा तृतीय, मयुरी खैरनार उत्तेजनार्थ, व फ्लॉवर रांगोळी स्पर्धेत दिव्या भामटे प्रथम, कुणाल सोनवणे व दुर्गेश घरटे द्वितीय, आदिती सरक तृतीय, हर्षदा अहिरराव व मनीषा पवार उत्तेजणार्थ क्रमांक प्राप्त केला. कार्यक्रमाचे संचालन डॉ चंद्रकांत कढरे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ पंकज अहिरे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संयोजन समितीचे डॉ ज्ञानेश्वर चव्हाण, प्रा विश्वास भामरे, डॉ लहू पवार, राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ प्रदीप राठोड, शारीरिक व क्रीडा संचालक डॉ हसीन खा तडवी, रासेयो सहाय्यक अधिकारी प्रा सुरेंद्र मगर, युवती सभेच्या प्रमुख ज्योती वाकोडे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमात महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी बांधव व विद्यार्थी बहुसंख्येने होते.

**News regarding organization of Blood Group Detection Camp and Blood Donation Camp as well as Various activities**

# Academic Year 2023-24

## 7.2 Best Practices




**Blood Donation Camp**

# Academic Year 2023-24

## 7.2 Best Practices

# साक्री येथे सि. गो.पाटील महाविद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी




**साक्री (अनिल देसले,दै. धुळे दवंडी) :** युवकांनी स्वतःमधील सामर्थ्य ओळखून आपल्या अंतर्गत असलेल्या दिव्यत्वाला प्रज्वलित करून आंतरिक व बाह्य स्वरूपातील मर्यादांवर तसेच संकटांवर मात करावी असे मत तळोदा महाविद्यालयाचे प्रा डॉ जयपालसिंग शिंदे यांनी व्यक्त केले.

ते विद्या विकास मंडळाचे सिताराम गोविंद पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री येथे चाणक्य स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातर्फे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात " स्वामी विवेकानंद: जीवन आणि कार्य "या विषयावर बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ अनंत पाटील होते.प्रसंगी डॉ प्रकाश साळुंके, डॉ लहू पवार, ज्ञानेश्वर चव्हाण उपस्थित होते. डॉ जयपालसिंग शिंदे बोलताना पुढे म्हणाले की, स्वामी विवेकानंदांनी पौराद्य आणि पाश्चिमात्य संस्कृतीचा सेतू बांधण्याची कार्य केले. शिक्षण हे व्यक्तीच्या आंतरिक असलेली ऊर्जा प्रज्वलित करत असून या शिक्षणाद्वारे युवकांनी चांगले विचार,तत्त्वज्ञान आत्मसात करून स्वतःचे तसेच राष्ट्राचे चारित्र्य घडविण्याचा उपदेश स्वामी विवेकानंदांनी तरुणांना दिला असल्याचे मत देखील त्यांनी व्यक्त केले. स्वामी विवेकानंदांच्या विचाराचा केंद्रबिंदू धर्म,अध्यात्म,परमेश्वर नसून तो माणूस असल्याचे देखील त्यांनी प्रसंगी नमूद केले. अध्यक्षीय मनोगतात उपप्राचार्य डॉ अनंत पाटील यांनी यशस्वी जीवन जगण्यासाठी स्वामी विवेकानंदांनी शुद्ध जीवन, आचार, विचार, त्याग व अपमान पचवण्याची शक्ती या पाच गुणांचे महत्त्व सांगितल्याचे नमूद केले. बुद्धिमान तसेच ज्ञानी युवक चारित्र्यशिवाय कोणाशीही सामना करू शकत नाही हा स्वामी विवेकानंदांचा विचार देखील त्यांनी प्रसंगी नमूद केला. कार्यक्रमाचे संचालन चाणक्य स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचे समन्वयक डॉ प्रीतम तोरणे यांनी तर आभार प्रदर्शन सदस्य प्रा संदीप कदम यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा मुकेश वळवी, श्री शरद बोरसे,श्री प्रशांत बोरसे,श्री सुधाकर देवरे यांनी परिश्रम घेतले. सदर कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद शिक्षकेतर कर्मचारी बांधव व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

**National Youth Day**

# Academic Year 2023-24

## 7.2 Best Practices

सकाळ TODAY



**साक्री :** सी. गो. पाटील महाविद्यालयात करिअर कट्ट्याचे उद्‌घाटन करताना संस्थेचे उपाध्यक्ष चंद्रजित पाटील.

### पाटील महाविद्यालयात करिअर कट्ट्याचे उद्‌घाटन

**म्हसदी :** साक्री येथील विद्या विकास मंडळाच्या सी. गो. पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र अंतर्गत करिअर कट्टा फलकाचे उद्‌घाटन विद्या विकास मंडळाचे उपाध्यक्ष चंद्रजित पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. प्राचार्य डॉ. राजेंद्र अहिरे, उपप्राचार्य डॉ. अनंत पाटील, करिअर कट्टाचे माजी जिल्हा समन्वयक डॉ. सचिन गोवर्धने, आयक्यूएसीचे समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर चव्हाण, चाणक्य स्पर्धा परीक्षा केंद्राचे प्रमुख डॉ. प्रीतम तोरवणे, प्रा. सुरेंद्र मगर व आयोजक करिअर कट्टा महाविद्यालयीन समन्वयक प्रा. मुकेश वळवी, प्रा. संदीप कदम उपस्थित होते. प्राचार्य डॉ. अहिरे म्हणाले, लाखो रुपये खर्च करून शहरात आता विद्यार्थ्यांना जाण्याची गरज नाही. विद्यार्थ्यांना करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत मार्फत विविध कोर्सचा फायदा घेता येणार असून विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले. डॉ. सचिन गोवर्धने यांनी करिअर कट्टा उपक्रमांतर्गत चालणाऱ्या पन्नास कोर्सेसची माहिती, व्यावसायिक शिक्षण व स्पर्धा परीक्षेचे महत्त्व या विषयी माहिती दिली. समन्वयक प्रा. मुकेश वळवी, प्रा. संदीप कदम यांनी संयोजन केले.

**Career Katta Initiatives News**

# Academic Year 2023-24

## 7.2 Best Practices

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade
NAAC Re-Accredited (4th Cycle)

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**
**विद्यार्थी विकास विभाग आणि**
**विद्या विकास मंडळाचे,**
**सीताराम गोविंद पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री जि.धुळे**
NAAC Re-Accredited With 'A' Grade (CGPA 3.03) 3rd Cycle

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवशीय

**विद्यापीठस्तरीय**
**'श्रमसंस्कार, व्यक्तिमत्व व नेतृत्व विकास कार्यशाळा'**

दिनांक २३ ते २५ फेब्रुवारी २०२४

कार्यशाळा स्थळ : म्हसाई माता मंदिर ट्रस्ट निजामपूर, ता.साक्री, जि.धुळे

### University Level Workshop on Personality Development

# सी.गो.पाटील महाविद्यालयात तीन दिवसीय विद्यापीठ स्तरीय श्रमसंस्कार व्यक्तिमत्व व नेतृत्व विकास कार्यशाळा

साक्री (अनिल देसले,दै. धुळे दवंडी) : विद्यार्थ्यांनी कोणत्याही क्षेत्रात कार्य करत असताना फक्त बाह्य सुखाच्या आहारी जाऊन आत्मकेंद्रीत होण्यापेक्षा सामाजिक भान ठेवून नेतृत्व गुण संपादित करावे असे मत विद्या विकास मंडळाचे उपाध्यक्ष चंद्रजीत सुरेश पाटील यांनी व्यक्त केले.



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव विद्यार्थी विकास विभाग आणि विद्या विकास मंडळाची सिताराम गोविंद पाटील कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय साक्री यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय विद्यापीठ स्तरीय श्रमसंस्कार व्यक्तिमत्व व नेतृत्व विकास कार्यशाळेच्या उद्घाटन समारंभा प्रसंगी अध्यक्षीय मनोगतात ते बोलत होते. कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून कबचौ उमवी जळगाव चे व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ महेंद्र रघुवंशी उपस्थित होते. प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ राजेंद्र अहिरे, उपप्राचार्य डॉ अनंत पाटील, दामिनी पथकाच्या प्रमुख इला गावित,संयोजन समितीचे सदस्य डॉ कांतीलाल सोनवणे उपस्थित होते. चंद्रजीत सुरेश पाटील बोलताना पुढे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी समाजातील विविध प्रश्नांची जाणीव ठेवून या प्रश्नांचा नायनाट करण्याच्या उद्देशाने कार्यरत रहावे. मोबाईलच्या भ्रामक विश्वात न अडकता वास्तवात जगण्यासाठी प्रयत्न करावेत असे देखील मत त्यांनी प्रसंगी व्यक्त केले.कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ महेंद्र रघुवंशी यांनी आपल्या उद्घाटकीय मनोगतात सदर कार्यशाळेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या जीवनात अमुलाग्र बदल घडविण्यासाठी उपयुक्त असल्याचे मत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी समर्पणाची भावना अंगीकारून सर्वांना सामावून घेणारा नेता होण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न करावेत. वाईटाचा मोह तोडून चांगल्याची संगत करण्याचा देखील सल्ला त्यांनी प्रसंगी विद्यार्थ्यांना दिला.प्राचार्य डॉ राजेंद्र अहिरे यांनी आपल्या मनोगत विविध महाविद्यालयातून आलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत करून कार्यशाळेत सक्रियपणे सहभागी होण्याचे आव्हान केले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ चंद्रकांत कढरे व चमू ने गायलेल्या महाराष्ट्र गीताने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी डॉ पंकज अहिरे यांनी मांडले.

सदर कार्यक्रमाचे संचलन महिला विद्यार्थी विकास अधिकारी डॉ ज्योती वाकोडे यांनी तर आभार डॉ पंकज अहिरे यांनी व्यक्त केले. सदर कार्यशाळेत धुळे नंदुरबार जळगाव जिल्ह्यातील एकूण १३१ विद्यार्थी सहभागी झाले आहे. सदर कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी सहाय्यक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा योगेश आहेर, प्रा मुकेश वळवी, प्रा राजु देवकर, प्रा परेश तोरवणे, श्री शरद बोरसे परिश्रम घेत आहेत.